MHKO050001451996

श्री. रघुनाथ चव्हाण वि. श्री. बाळू चव्हाण वगैरे.

## नियमीत दिवाणी दावा क्र.३५०/१९९६ मधील निशाणी क्र.४०६ खालील आदेश

प्रतिवादी क्र.४८ ने प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेशीका ६, नियम १७ अन्वये दावा दुरुस्तीसाठी दाखल केलेला आहे.

०२. प्रतिवादी क्र.४८ अर्जात कथन करते की, वादी यांनी प्रतिवादी विरुध्द प्रस्तुतचा दावा वाटणीसाठी व स्वतंत्र कब्जासाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादी यांनी निशाणी क्र.११३ अन्वये कैफियत देऊन दावा आव्हानित केलेला आहे. त्यामध्ये काही कलमातील मजकुरामध्ये टंकिलखीत चुकीमुळे प्रतिवादी क्र.४८ ऐवजी प्रतिवादी क्र.४४ असे नमुद झालेले आहे. त्याअनुषंगाने प्रतिवादी क्र.४८ हिने टंकलिखानाची झालेली चूक दुरुस्त करण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दिलेला आहे. प्रतिवादीचे असे कथन आहे की, प्रस्तावित दुरुस्ती ही सामान्य स्वरुपाची असून कैफियतीमध्ये कोणताही बदल होणार नाही. सबब, प्रतिवादी क्र.४८ हिने अर्ज मंजुर करण्याची विनंती केली.

०३. त्याऊलट, वादीने प्रस्तुत अर्जास हरकत नोंदविली आहे. वादी असे कथन करतो की, प्रकरण अंतिम युक्तीवादावर असताना प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र.४८ हिने प्रस्तावित दुरुस्ती मागतेवेळी डयु डिलीजन्स दाखविलेला नाही व काम लांबविण्याच्या हेतुने अर्ज दाखल केलेला आहे. सबब, वादीतर्फे अर्ज नामंजुर करण्याची विनंती करण्यात आली व रक्कम रु. ५,०००/- खर्चाची मागणी केलेली आहे.

०४. वादी व प्रतिवादींतर्फे करण्यात आलेला युक्तीवाद ऐकला. प्रस्तुतचा दावा वादीने वाटणीसाठी व कब्जासाठी दाखल केलेला आहे. सद्यस्थितीत दाव्यामध्ये प्रतिवादींचा अंतिम युक्तीवाद सुरु आहे. दाव्याची सुनावणी संपण्यास आलेली आहे. असे असताना प्रतिवादी क्र.४८ हिने प्रस्तुतचा अर्ज दाखल करुन प्रस्तावित दुरुस्ती मागितलेली आहे. परंतु, प्रतिवादी क्र.४८ हिने प्रस्तावित दुरुस्ती मागत असताना दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६, नियम १७ च्या परंतुकाची पुर्तता केली आहे का हे पाहणे गरजेचे आहे. प्रतिवादीने

मागितलेली प्रस्तावित दुरुस्ती पाहता कैफियतीमधील मजकुरामध्ये टंकलिखीत चुकीमुळे ४८ या क्रमांकाच्या ठिकाणी ४४ असे नमुद झालेले आहे याबाबत शंका नाही. परंतु, प्रतिवादीला प्रस्तावित दुरुस्ती यापुर्वी देखील मागता आली असती, कारण दावा सन-१९९६ सालापासून प्रलंबित आहे. प्रतिवादी क्र.४८ हिने सन-२००५ मध्ये कैफियत दिलेली आहे. सन-२००५ पासून सन-२०२० पर्यंत म्हणजेच जवळजवळ १५ वर्षांच्या कालावधीमध्ये प्रस्तावित दुरुस्ती का मागितलेली नाही याबाबत स्पष्टीकरण देणे गरजेचे होते. परंतु, तसे स्पष्टीकरण प्रतिवादी क्र.४८ ने अर्जामध्ये नमुद केलेले नाही. तरीदेखील प्रतिवादीने मागितलेली दुरुस्ती ही सामान्य स्वरुपाची असल्यामुळे व भविष्यातील गुंतागुंत टाळण्याकरीता ती मंजुर करणे न्यायोचित आहे असे मला वाटते. तसेच प्रस्तावित दुरुस्ती मंजुर केल्यास त्यामुळे वादीला कोणतीही इजा पोहचणार नाही. त्याशिवाय त्यामुळे वाद तथ्यांमध्ये स्पष्टता येणार आहे. सबब, प्रस्तावित दुरुस्ती मंजुर करणे मला आवश्यक वाटत आहे. प्रतिवादी क्र.४८ ने प्रस्तावित दुरुस्ती मागण्यास झालेल्या विलंबाबाबत कोणतेही समाधानकारक कारण दिलेले नाही. त्यामुळे, अर्जाचा खर्च प्रतिवादी क्र.४८ वर ठेवणे उचित होईल. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

**-: आदेश :-**

०१. अर्ज (निशाणी क्र.४०६) रक्कम रु.२०००/- च्या खर्चासह मंजुर करण्यात येतो.

०२. खर्चाची रक्कम वादीला देण्यात यावी. खर्चाची रक्कम वादीला दिल्यानंतर प्रतिवादी क्र.४८ ने अर्जात सुचविलेली दुरुस्ती १४ दिवसांच्या आत कैफियतीमध्ये करुन त्याअनुषंगाने दुरुस्त कैफफियतीच्या प्रती न्यायालयात सादर करावयात.

(खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला)

Digitally signed by Pradip Madan Mane
Date: 2020.02.15 17:44:56 +0530

दिनांकः १५/०२/२०२०.
इचलकरंजी.

**( पी.एम.माने)**
४थे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
इचलकरंजी.

I affirm that the contents of this P.D.F file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of stenographer | R. D. Patil. |
| Name of Court | P. M. Mane,<br>4th Jt. Civil Judge Jr. Dvn. and Judicial Magistrate First Class, Ichalkaranji. |
| Date of Dictation | 15/02/2020 |
| Order signed by P.O. on | 15/02/2020 |
| Order uploaded on | 15/02/2020 |